
# न वटणाऱ्या धनादेशाबाबत

धनादेश म्हणजे काय व त्याचे कायद्यात महत्त्व काय?

धनादेश न वटल्यास पोलिसात तक्रार करता येते का?




ॲड. अरुण गो. देशमुख

हक्क गमावून बसतो आणि त्यातूनही लढत द्यावयास गेला तर दिवाणी पद्धतीने वर्षानुवर्षे त्याचा न्याय खितपत पडतो.

अर्थात आज धनादेशाबाबत एवढे दावे प्रलंबित आहेत की दर चार दंडाधिकारी मागे एक दंडाधिकाऱ्यांचे न्यायालय फक्त धनादेशांच्या दाव्यांसाठी राखून ठेवावे लागत आहे. अर्थात एवढे होऊनही दाव्यांचा निकाल तसा चटकन लागत नाही ही सत्य परिस्थिती आहे.

सदर पुस्तकात मी धनादेशाबाबत असणारे फौजदारी तसेच दिवाणी कायदे त्याबाबत द्यावयाची नोटीस इ. दिले असून अनावश्यक किचकट कायदे मुद्दामहून दिलेले नाही. सोप्या भाषेतील सामान्य व्यक्तिलाही समजेल असे हे पुस्तक त्यांच्या मनातील असणाऱ्या शंकांचे निरसन करेल ह्या बाबत माझ्या मनात शंका नाही.

आपल्यासमोर धनादेश न वटल्यास हे पुस्तक प्रकाशित करताना मला मनापासून आनंद वाटत आहे. सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाईप करीत लिहिलेले आहे. सदर पुस्तकाची बरीच पाने ही मी सांगून व माझ्या पत्नीने सौ. अर्चना देशमुख हीने टाईप करून लिहिली आहेत. त्यामुळे तिचे तसेच मला नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या आईचे या पुस्तकाद्वारे मी ऋण व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रणदोष श्री. मनोहर साळवी यांनी पाहिलेले आहे. सदर पुस्तकास दोन शब्द ॲड. प्रशांत पानसरे यांनी लिहिलेले असून या सर्वजणांचा मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

हे पुस्तक लिखाण करण्याची संधी आणि प्रेरणा मला मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांचेमुळे मिळाली असून त्यांच्या ह्या पाठींब्यामुळेच मला ही साहित्य सेवा अखंडीत चालू ठेवता येत आहे व यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

हे पुस्तक सामान्य व्यक्तिसाठी नक्कीच उपयोगी ठरेल अशी मला आशा वाटते. पुस्तक वाचून आपण काही दुरूस्ती/योग्य असे काही सुचवल्यास त्याबाबत पुढील आवृत्तीत नक्कीच सुधारणा करण्याचा प्रयत्न करीन. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वर चरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम...

**ॲड. अरूण गोविंद देशमुख**

# प्रकरण - १

## धनादेश म्हणजे काय व त्याचे कायद्यात महत्त्व काय ?

### १. अ) धनादेश म्हणजे काय ?

धन देण्याबाबतचा आदेश म्हणजे धनादेश. धनादेशाला चेक (CHEQUE) असे इंग्रजीत सर्वसाधारणपणे ओळखले जाते. सदर आदेश हा विशिष्ठ बँकेच्या खात्याचा व तो शाईने किंवा बॉलपेनमध्ये किंवा टाईप केलेला अगर छापील असलेला चालतो. धनादेश पेन्सिलने लिहिलेला चालत नाही. कारण त्यात सहज बदल करता येऊ शकतो. झेरॉक्स कॉपीचा धनादेश चालत नाही. धनादेशात एक विशिष्ठ रक्कम ( अंक व शब्दात लिहिलेली ) व धनादेशाची तारीख असते. धन देण्याबाबतचा आदेश देताना ते पैसे स्वत: किंवा कोणाच्या नावे असे देण्यासाठी लिहिलेले असलेले पाहिजे. रेखीत धनादेश केलेला नसला तर तो धनादेश दर्शनी धनादेश ठरतो व तो कोणालाही वटवता येतो. यातील पैसे देण्याचा आदेश विनाअट असायला हवा. विशिष्ट घटना घडली तर तो धनादेश द्यावा असा आदेश असणारा धनादेश अगदी अयोग्य असतो व तो रद्दबातल ठरतो. धनादेशात आदेश देणाऱ्याची सही आणि वैयक्तिक नसल्यास शिक्का.

### १. ब) धनादेशमध्ये पुढील भाग महत्त्वाचे ठरतात.

१) धनादेश लेखी असतो.

२) धनादेश एका विशिष्ठ बँकेच्या नावावर असतो.

३) धनादेशात विशिष्ठ पैशाच्या रक्कमेचा आदेश असतो.

४) धनादेशामध्ये पैसे घेणाऱ्याचे नाव पाहिजे किंवा स्वत: (Self) करिता म्हणून उल्लेख पाहिजे.

५) धनादेशात ज्या तारखेस तो लिहिला त्या तारखेचा उल्लेख पाहिजे.

६) धनादेश हा विनाअट आदेश असतो.

७) धनादेशामध्ये तो अदा करणाऱ्याची स्वाक्षरी वा अंगठा ( व

वैयक्तिक नसल्यास शिक्का व सही ) असतो.

### १. क) धनादेशामधील सहभागी असणाऱ्या व्यक्ती

१) चेक लिहून देणारी व्यक्ती ( DRAWER )

२) ज्या विशिष्ठ माणसाच्या नावाने तो धनादेश दिला जातो म्हणजेच पैसे घेणारी व्यक्ती ( PAYEE )

३) ज्या व्यक्तीला पैसे देण्याचा आदेश असतो ती म्हणजे ती विशिष्ठ बँक किंवा पतपेढी वा तत्सम व्यक्ती. ( DRAWER )

४) ज्या व्यक्तिच्या कब्जात असा धनादेश असतो आणि ज्याला पैसे मिळण्याचा अगर वसूल करण्याचा हक्क असतो ती व्यक्ती धनादेशाची धारक असते. ( HOLDER )

५) काही धनादेशावर BEARER अगर ORDER असा शेरा असतो आणि त्याप्रमाणे तसा अधिकार तात्पुरता मिळतो तर असा अधिकार देणारी देय धारक व्यक्ती होते. ( HOLDER IN DUE COURSE )

६) धनादेशाच्या मागे धनादेश धारण करणारी व्यक्ती जेव्हा स्वत:ची सही करतो तेव्हा तो मान्यता देणारा बनतो. ( ENDORSER )

### १. ड) धनादेशाचे पुढीलप्रमाणे प्रकार असतात

१) दर्शनी धनादेश ( BEARER CHEQUE ) हा विशिष्ठ व्यक्तिसाठी नसतो. उदा. Self. एकप्रकारे तो रोखीचाच व्यवहार असतो. यात धनादेश धारण करणारी व्यक्ती बँकेत सदर दर्शनी धनादेश ( BEARER CHEQUE) सादर करून पैसे मिळवते.

२) रेखीत धनादेश ( CROSS CHEQUE ) ज्यावेळेस धनादेशावर दोन तिरक्या समांतर रेषा काढलेल्या असतात किंवा काही वेळा ' आणि कंपनी ' वाटाघाटी योग्य नाही असे शब्द असतात तर सदर धनादेश हा रेखीत धनादेश म्हणून मानला जातो. धनादेशात सर्वात सुरक्षित असतो तो रेखीत धनादेश.

३) प्रवासी धनादेश ( TRAVELLERS CHEQUE ) प्रवासात जास्त रोख पैसे जवळ ठेवू नयेत म्हणून सोईकरता पुढे पैसे मिळविणेकरिता प्रवासी धनादेश वापरला जातो. ह्यासाठी प्रथम विशिष्ठ बँकेत पैसे भरून असे धनादेश खरेदी करतात आणि त्यावर बँक अधिकाऱ्यासमोर सही करतात. आणि मग प्रवासात संबंधी बँकेत हजर करून पैसे मिळतात.

# प्रकरण - २

## धनादेश नाकारले जाणे

### २. अ) धनादेश नाकारणे

धनादेश एकदा नाकारला गेला की, कलम १३८ प्रमाणे फौजदारी कारवाई सुरू होते. धनादेश नाकारले जाणे ( DISHONOUR ) म्हणजे काय या करता कलम ९२ पाहाणे आवश्यक आहे.

कलम ९२ Negotiable Instrument Act म्हणजे - " पैसे दिले नाहीत म्हणून नाकारणे यात वचन चिठ्ठी-हुंडी-अगर धनादेश येतात. ज्यावेळी धनादेशधारकाला धनादेश देणारा पैसे देत नाही आणि तशी पैसे देण्याची त्याची जबाबदारी असते. म्हणजेच बँकेत जेव्हा धनादेश सादर केला त्यावेळी बँक पैसे देत नाही याचाच अर्थ धनादेश नाकारला जातो. त्याचक्षणी धनादेशधारकाला कायदेशीर कारवाईचा हक्क प्राप्त होतो. "

कलम १३८ खाली अपराध घडण्याकरता तो बँकेमार्फत नाकारला गेलेला असला पाहिजे. आणि त्यामुळे धनादेश धारण करणाऱ्यास ( HOLDER ) पैसे मिळत नाही. असा धनादेश जर पुढील तारखेचा ( POST DATED ) असेल, तर आधीच्या तारखेस बँकेत सादर करताच येत नाही. त्यामुळे दाखल करण्याचे तारखेपर्यंत असा धनादेश केवळ हुंडी ( BILL OFF EXCHANGE ) म्हणून समजला जातो. दर्शविलेल्या तारखेपासूनच तो धनादेश स्वरूपात समजला जातो.

### २. ब) धनादेश नाकारला जाण्याचे प्रकार

धनादेश नाकारला जातो तेव्हा त्यात दोन प्रकार असतात.

i) योग्य पद्धतीने नाकारणे ( Rightful Dishonoured )

ii) चुकीच्या पद्धतीने नाकारणे ( Wrongful Dishonour )

ज्यावेळेस धनादेश बँकेत नाकारला जाण्याकरता बँकेकडे काही कारणे असतात त्यावेळी त्याला योग्य पद्धतीने नाकारणे ( Rightful

Dishonour ) म्हणतात.

तर ज्यावेळी बँकेच्या अगर त्यांच्या कर्मचाऱ्याच्या निष्काळजीने असे घडले तर त्याला चुकीच्या पद्धतीने नाकारणे ( Wroungful Dishonour ) म्हणतात. त्यावेळी दिवाणी दावा ( Civil Procedure code) ऑर्डर ३७ प्रमाणे कारवाई करतात. फौजदारी कारवाई आय. पी. सी. ( Indian Penal Code ) कलम २० प्रमाणे अगर Negotiable Instrument Act 1881 प्रमाणे घेता येतो.

## २. क) ड्राफ्ट आणि धनादेश यातील फरक

वास्तविक ड्राफ्ट आणि धनादेश या दोन्हीत फारसा फरक नाही. त्यामुळेच नाकारलेला ड्राफ्ट आणि धनादेश हे एकाच पातळीवर असतात. मात्र ढोबळ फरक हा असतो की ड्राफ्ट ही एक बँक दुसऱ्या बँकेला देते आणि सदर ड्राफ्ट काढणारा आगाऊ पैसे भरतो.

ड्राफ्ट आणि धनादेश या दोघांमध्ये मुलभूत फरक दोन असतात.

१) ड्राफ्ट एक बँक दुसऱ्या बँकेचे नावाने देते तर धनादेश मात्र खाजगी इसम दुसऱ्याला देतो.

२) धनादेशाप्रमाणे ड्राफ्ट विकत घेणारा तो जेव्हा सादर करतो तेव्हा दुसरी बँक सहजपणे ते नाकारू शकत नाही.

३) ड्राफ्टमध्ये देणारा त्याची रक्कम त्या ड्राफ्ट देणाऱ्या बँकेत पहिल्यांदा भरतो तर धनादेशात तसे नसते.

ड्राफ्टचे संदर्भात केवळ सावकार कर्जदार नाते नसून नातेसंबंध ट्रस्ट आणि ट्रस्टीचा असतो. ड्राफ्ट घेणाऱ्याने प्रत्यक्षात तो पुढे दुसऱ्या व्यक्तिस मिळण्यापूर्वी तो ड्राफ्ट रद्द केला आणि परत करीत बँकेला जर पैसे मागितले तर, बँकेला ते पैसे परत द्यावे लागतात.

## २. ड) धनादेश गहाळ होणे

दिलेला धनादेश पोस्टातून किंवा इतर कुठूनही गहाळ झाला तर पुन्हा दुसरा धनादेश काढण्यासाठी धनादेशधारक विनंती करू शकतो. पण त्याकरिता योग्य तो जामीन कलम ४५-अ Negotiable Instrument Act १८८१ प्रमाणे द्यावा लागतो. आणि मग नवीन धनादेश देण्याचे बंधन आहे. ज्यावेळेस असा दुसरा धनादेश दिला जातो तेव्हा दिलेला पहिला धनादेश रद्द करण्याबाबतचे पत्रही धनादेशधारक बँकेस देऊन सदर १ ला धनादेश रद्द करून घेतो. धनादेश जेव्हा नाकारला जातो त्यावेळी बँकेने संबंधीत धनादेश धारकाला त्वरीत कळविले पाहिजे. त्यासाठी बँका सदर धनादेश धारकाकडून आकारही घेतात.

# प्रकरण - ३

# धनादेश ( CHEQUES )

## ३. अ) धनादेश ( CHEQUES ) म्हणजे काय ?

धन देण्याबाबतचा आदेश म्हणजे धनादेश. सदर आदेश हा विशिष्ठ बँकेच्या खात्याचा व तो शाईने किंवा बॉलपेनमध्ये किंवा टाईप केलेला अगर छापील असलेला चालतो परंतु पेन्सिलने लिहिलेला नसावा. झेरॉक्स कॉपीचा धनादेश चालणार नाही. धनादेशात एक विशिष्ठ रक्कम ( अंक व शब्दात लिहिलेली ) व धनादेशाची तारीख असते. धन देण्याबाबतचा आदेश ते पैसे स्वत: किंवा कोणाच्या नावे असे देण्यासाठी लिहिलेले असलेले पाहिजे. रेखीत धनादेश केलेला नसला तर तो धनादेश दर्शनी धनादेश ठरतो व तो कोणालाही वटवता येतो. यातील पैसे देण्याचा आदेश विनाअट असायला हवा. विशिष्ट घटना घडली तर तो धनादेश द्यावा असा आदेश असणारा धनादेश अगदी अयोग्य असतो व तो रद्दबातल होतो. धनादेशाला आदेश देणाऱ्याची सही/आवश्यक तेथे शिक्का असतो.

## ३. ब) पैसे-धनादेश-चलन

पैसे म्हटले की भारतीयांच्या डोळयासमोर येतात एक तर नाणी नाहीतर कुठेतरी १०० ची नोट ज्यावर एका बाजूला रिझर्व बँकेचा गव्हर्नर म्हणत असतो की मै धारक को एक सौ रूपये अदा करने का वचन देता हूँ। ( म्हणजेच मी या नोटेच्या धारकाला १०० रूपये देण्याचे वचन देतो ) तर महात्मा गांधींचे ठळक चित्र व वॉटर मार्कही गांधींचाच असो. खरे तर पैसे म्हटले की माझ्या समोर विविध देशांची नाणी वा नोटा नजरे समोर येतात. पैसा तसे म्हटले तर सर्व जगाला एकप्रकारे स्वत:भोवती नाचवत असतो. पैसे हे देशासाठी, समाजासाठी वैयक्तिक संस्था वा माणसांसाठी एकप्रकारे देवाण-घेवाणासाठी माध्यम म्हणून काम करत असते आणि हेच त्याचे समाजासाठी विशिष्ठ काम ठरते. पैसे हे व्यवहाराचे एक अविभाज्य माध्यम

आहे. ज्या ज्यावेळी पैशाच्या बदल्यात काहीच मिळेनासे होते तेव्हा त्या वरचा लोकांचा व समाजाचा विश्वास उडू लागतो. अगदी ताजे उदाहरण म्हणजे मध्यंतरी ५०० च्या अनेक खोट्या नोटा चलनात आलेल्या होत्या. तेव्हा हे नक्की होते की नोटा काही फक्त ५०० च्याच खोट्या नव्हत्या तरीही ५०० ची नोट पाहिली की सामान्याच्या पोटात धडकी भरायची. कारण सहजरित्या प्रत्येकजण ती नाकारायचा. अगदी सरकारी कार्यालय ती स्वीकारताना तुमचे नांव त्या नोटेच्या क्रमांकासहीत लिहून ठेवायचे. त्यामुळे झाले असे की सर्वजण ५०० ची नोट टाळत होते. रशियात काही वर्षांपूर्वी असेच घडले. बादलीभर पैसे घेऊनही साधा खाण्यासाठी पावही मिळेना तेव्हा त्या परिस्थितीत लोकांचा पैशांवरचा विश्वास उडाला.

आपल्या देशातच काही दशकापूर्वी चलनातील ५००० व १०,००० च्या नोटा बाद करण्यात आल्या. हा निर्णय काळा पैसा बाहेर येण्यासाठी होता. मात्र त्यावेळेला ज्यांच्याकडे त्या नोटा होत्या त्यांची अवस्था बिकट झाली होती. पेपरात तर काही जण त्या १०,००० नोटेची सुरकांडी करून त्यात तंबाखू भरून सिगारेट शिलगवतानाची बातमी आलेली होती.

त्यामुळे पैसे हे व्यवहारात विश्वासाने दिले घेतले जाते आणि म्हणूनच तिथंपर्यंत ते चलनात राहाते.

पैसे हे या ना त्या रूपात इसवी सन पूर्व ५००० पासून अस्तित्वात आहे. अगदी सुरुवातीस बार्टर पद्धत चालायची. ज्यात वस्तूच्या बदल्यात वस्तू दिली घेतली जायची. मात्र यात अनेक अडचणी यायला लागल्या. त्यामुळे वस्तूचे मूल्यमापन करण्यासाठी चलन म्हणून त्या त्या वेळेच्या टोळ्यांनी व नंतर राजे-महाराजांनी स्वत:ची नाणी टाकसाळीतून तयार करीत चलनात आणली. दगडाच्या नाण्यापासून सोन्याच्या मोहोराच्या नाण्यापर्यंत बदलत जाणाऱ्या या चलनाचे स्वरूप सातत्याने बदलत आहे. किंबहुना आजही बदलते आहे. कालानुरूप नाणी मागे पडत नोटा आल्या.

त्यानंतर बँका आल्या. त्यांच्या मदतीने धनादेश हा प्रकार अस्तित्वात आला. कायद्याच्या चौकटीत धनादेश असल्याने आजच्या काळातील प्लॅस्टीक मनी म्हणजे क्रेडीट कार्ड, स्मार्ट कार्ड याच्या वसुलीसाठी किंवा वैयक्तिक कर्ज काढलेले असेल तरी कोरा धनादेश घेऊन स्वत:ला सुरक्षित केले जाते.

आर्थिक व्यवहाराच्या सोईसाठी पर्यायी व्यवस्था चलन म्हणून वापरली जाते. हुंड्या-वचन चिठ्ठ्या-धनादेश यांचा वापर केला जातो. व्यापारी उलाढालीसाठी आणि सर्वच आर्थिक व्यवहारासाठी

वाटाघाटीसाठी ( NEGOTATIVE ) करण्याकरता जो दस्ताऐवज वापरला जातो त्यालाच इंग्रजीत ( NEGOTIABLE INSTRUMENT ) म्हणतात. त्याकरता स्वतंत्रपणे भारताचा कायदा Negotiable Instrument Act १८८१ चा आहे. त्यामधील कलम ५ मध्ये हुंडी म्हणजे ( Bill of Exchange ) याचा अर्थ सांगितलेला आहे. तो लेखी दस्तऐवज सही केलेला असतो आणि विशिष्ठ व्यक्तिस विशिष्ठ तारखेस किंवा सादर केल्यावर पैसे देण्याचा त्यात आदेश असतो.

धनादेश ही एकाप्रकारे हुंडी असते. ज्यात धनादेश काढणारा त्याच्या विशिष्ठ बँकेस तो धनादेश सादर झाल्यावर पैसे देण्याबद्दल सूचना करत असतो. त्यामुळेच Negotiable Instrument Act १८८१ च्या कलम ६ मध्ये धनादेश म्हणजे विशिष्ठ बँकेवर काढलेली हुंडी आणि मागणी करण्यात आली की अदा करण्याची सूचना असणारी असते. जी हुंडी भले बँकेच्या तर्फे सादर केलेली असेल पण जेव्हा सादर केली जाईल तेव्हा ती अदा करण्याबाबत सूचना नसेल तर ती धनादेश होऊ शकत नाही.

### ३. क) धनादेशाचे प्रमुख घटक

१) धनादेश हा लेखी दस्तऐवज असतो.

२) धनादेशात विशिष्ठ बँकेला उद्देशून आदेश असतो.

३) या धनादेशात आदेशाची तारीख दिलेली असते.

४) दिलेल्या तारखेपासून सहा महिन्यांचे आत धनादेश सादर करावा लागतो.

५) जर धनादेश पुढील तारखेचा ( Post Dated ) धनादेश असतो तेव्हा त्या तारखेनंतरच तो सादर करावा लागतो.

६) धनादेशाच्या रक्कमेची ज्याच्याकडे धनादेश आहे त्याच्यातर्फे मागणी करावी लागते.

७) हे कलम लागू होण्यासाठी धनादेशात ज्याला रक्कम देणे आहे, त्याचे नाव त्या धनादेशात नमूद केलेले पाहिजे.

८) धनादेशातील रक्कम अक्षरी व आकड्यात नमूद करावी लागते.

### ३. ड) बँकेचा मेमो

विविध कारणांकरता धनादेश नाकारला जात असतो आणि तो नाकारला जाण्याच्या कारणासहीत बँक तो सादर करणाऱ्याला कळवित असते. जो ठराविक नमुना फॉर्म धनादेश धारकाला पाठविला जातो त्यास